MHJN060018122016

## आदेश निशाणी क्रमांक ०१ वर पारीत

अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा पुर्वी वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला होता. प्रतिवादी हजर झाल्यानंतर या न्यायालयाचे सन्माननिय पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.१९ येथे वादमुद्दे निश्चित केले. परंतू त्यानंतर वादी यांनी प्रस्तुत दाव्याकामी दुरुस्ती केली व सदर दुरुस्तीअन्वये प्रस्तुत दाव्याचे स्वरुप बदलेले आहे. त्यामुळे सद्यःस्थितीच्या अभिलेखावरील वादकथनावरुन पुर्वीचे वादमुद्दांमध्ये पुर्णपणे दुरुस्ती होणे गरजेचे आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १४ नियम ५ अन्वये दुरुती वादमुद्दे निश्चित करणे प्रस्तुत दाव्याचा अंतीम न्यायनिर्णय होणेच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, नवीन दुरुस्त वादमुद्दे खालील प्रमाणे.

## // दुरुस्ती वादमुद्दे //

| | |
|---|---|
| १. | वादी हे सिध्द करतात काय की, ते दावा मिळकतीचे मालक असून प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी अतिक्रमण करुन दावा मिळकतीमध्ये आर.आर.सी. बांधकाम करणेपुर्वी दावा मिळकतीमध्ये त्यांची अव्याहतपणे कब्जे वहिती होती ? |

| | |
|---|---|
| २. | वादी हे सिध्द करतात काय की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने अतिक्रमण करुन आर.आर.सी. बांधकाम केले ? |
| ३. | वादी हे दाव्यात मागणी केल्याप्रमाणे दावा मिळकतीतील आर.आर.सी. बांधकाम हटवून दावा मिळकतीचा ताबा मिळणेस पात्र आहेत काय ? |
| ४. | प्रतिवादी हे वादीकडून नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहेत काय ? |
| ५. | आदेश व हुकूमनामा काय ? |

Digitally signed by DESHPANDE CHAITANYA SUNILDATTA
Date: 2024.05.06 11:48:43 +0530

ठिकाण :– भोकरदन.
दिनांक :– ०६/०५/२०२४.

(सी. एस. देशपांडे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन.